Iо

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** आटपाडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0446  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/12/2023 02:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 29/12/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/12/2023
   **Time From (वेळेपासून):** 16:10 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:42 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/12/2023  **Time (वेळ):** 01:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/12/2023 01:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्राथमिक आरोग्य केंद्र, आटपाडी,आटपाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अमोल कुंडलीक विभुते

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ग्रामपंचायत जवळ, बोबेवाडी, ,आटपाडी,आटपाडी,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ग्रामपंचायत जवळ, बोबेवाडी, ,आटपाडी,आटपाडी,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुधाकर कष्णा कुंभार | | | 1. पिंपरी खुर्द सजा, ता आटपाडी, आटपाडी,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | बाळासो बापुराव पाटील | | | 1. पाटील मळा, पांढरेवाडी रोड, , आटपाडी,आटपाडी,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | दोन हजार रू | 2,000.00 |



Scanned with OKEN Scanner

नोंद करणेकरीता
सजा
अधीक्षक
पिंपरी यांचे
CCTN



**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 30.12.2023

मी अमोल कुंडलीक विभुते, वय 35 वर्ष, व्यवसाय :- शेती, रा. ग्रामपंचायत जवळ, बोंबेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली. मो.नं. 8788953383, 8275459243

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. आमची मौजे बोंबेवाडी येथे गट नं. 661 क्षेत्र 0.9625 आर अशी वडीलार्जीत जमीन आहे . माझे वडील कुंडलिक भिमराव विभुते यांनी दि. 20.12.2023 रोजी दस्त क्रमांक 3254/2023 अन्वये सदर जमिन माझी आई सौ. निर्मला कुंडलिक विभुते यांचे नावे बक्षीसपत्र करून दिलेली आहे. सदर बक्षिसपत्राची 7/12 सदरी नोंद करणेकरीता तलाठी श्री. कुंभार, तलाठी सजा पिंपरी यांनी माझेकडे 2,000/- रूपये लाचेची मागणी केली होती.

श्री. कुंभार, तलाठी सजा पिंपरी खुर्द यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.29.12.2023 रोजी 12.30 वा चे सुमारास पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना फोनवर संपर्क साधुन माझी श्री. कुंभार, तलाठी सजा पिंपरी यांचेविरूध्द लाच मागणीबाबतची तक्रार सांगुन मी तक्रार देणेस सांगली येथे येवू शकत नसल्याने माझी तक्रार आटपाडी येथे येवून घेणेबाबत विनंती केली. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.संदीप पाटील यांनी मला आम्ही आटपाडी येथे आलेनंतर संपर्क करीत असलेबाबत सांगितले होते.

श्री. संदीप पाटील साहेब यांनी मला दि. 29.12.2023 रोजी 15.30 वा. संपर्क करून मला आटपाडी ते सांगली जाणारे रोडवरील सावंतपुर वसाहत जवळील कॅनॉलचे रोडकडेला येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सावंतपुर वसाहत जवळचे कॅनॉलचे रोडकडेला जावून श्री. संदीप पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील यांनी मला त्यांचेकडील वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझेकडील मोटार सायकल पार्क करून त्यांचेकडील वाहनामध्ये बसलो. श्री. संदीप पाटील साहेब यांनी माझी पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय पुजारी साहेब व सापळा पथकाची व दोन सरकारी पंचांची ओळख करून दिली. त्यानंतर मी पाटील साहेब, पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय पुजारी साहेब व पंचांना माझी श्री. कुंभार, तलाठी पिंपरी यांचेविरूध्द लाच मागणी बाबतची तक्रार समक्ष सांगितली असता पुजारी साहेब यांनी मला लेखी तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारी अर्जावर पोलीस निरीक्षक पुजारी साहेब व दोन्ही पंचानी वाचून सह्या केल्या.

त्यानंतर श्री. कुंभार, तलाठी यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पुजारी साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली व सदर कारवाई वेळी पंच नं. 1 म्हणून श्री. बालाजी देशमुखे यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. शंतनु सुर्यवंशी यांनी काम करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 देशमुखे असे माझेकडील मोटार सायकल नंबर एमएच 10 बीई 6769 ने रवाना होवून तहसील कार्यालय आटपाडी येथील पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये जावून श्री. कुंभार, तलाठी पिंपरी यांची भेट घेवून परत श्री. पुजारी साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो. सदर पडताळणी कारवाईमध्ये मध्ये पुजारी साहेबांनी मला व पंच देशमुखे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

त्यामध्ये माझेत व श्री. कुंभार, तलाठी यांचेमध्ये माझ्या वडीलांनी आईचे नावे केलेले बक्षीसपत्राची नोंद 7/12 सदरी करून उतारा देणेबाबत चर्चा झाली. त्यावेळी श्री.कुंभार तलाठी यांनी मला "असं कर की" असे म्हणून हाताची दोन बोटे दाखवुन "आता दे" असे म्हणुन माझेकडे 2,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी श्री. कुंभार तलाठी यांना "दोन हजार आता दयायचं व्हय ?" असे विचारले असता श्री. कुंभार तलाठी यांनी "हां" असे म्हणुन "सर्कलच्यावेळी हे कर" असे म्हणुन हाताचे एक बोट दाखवुन सर्कल यांना त्यावेळेस 1,000/- रूपये



Scanned with OKEN Scanner

देण्यास सांगितले व त्यांनी "म्हणजे तुझं कामच ओके करून देतो....तुझं काय मत आहे" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "दोन्ही एकदाच देवुन टाकतो की....काय काळजी करता तुम्ही" असे म्हणालो. त्यावर श्री.कुंभार तलाठी यांनी "कसं असतंय.....आता आपल्या पुरतंच दयायचं, आणि विषय इथं.." असे म्हणुन पुन्हा हाताची दोन बोट दाखवुन पैसे देण्याबाबत इशारा करून "देवुन टाक" असे म्हणुन माझेकडे 2,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना "आता जवळ न्हायत मी आणुन देतो तुम्हाला" असे म्हणालो. त्यावेळी श्री.कुंभार, तलाठी यांनी मला लाच रक्कम लागलीच घेवुन येणेस सांगीतले.

एकंदरीत झाले पडताळणी कारवाईमध्ये श्री. कुंभार, तलाठी यांनी पैसे लागलीच घेवून येण्यास सांगितले असल्याने श्री. पुजारी साहेब यांनी लागलीच श्री. कुंभार, तलाठी यांच्यावर सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला लाच रक्कम हजर करणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील शिल्लकीतील 2,000/- रुपये पुजारी साहेब यांचे समक्ष हजर केले. त्यानंतर श्री. पुजारी साहेब यांनी लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, श्री. पुजारी साहेब व मी सही केली. श्री. पुजारी साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवल्या व पुजारी साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच देशमुखे असे माझेकडील मोटार सायकलवरून व श्री. पुजारी साहेब व सापळा पथक त्यांचेकडील वाहनाने आमचे पाठोपाठ रवाना होवून तहसिल कार्यालय आटपाडी येथे दाखल झालो. आमचे पाठोपाठ पुजारी साहेब, पंच सुर्यवंशी व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने तहसिल कार्यालय, आटपाडी येथे दाखल झाले. मी व पंच देशमुखे असे माझेकडील मोटारसायकल तहसील कार्यालयाचे पार्किंगमध्ये पार्क करून कार्यालयामध्ये गेलो. आमचे पाठोपाठ पुजारी साहेब व सापळा पथक असे तहसिल कार्यालय आटपाडी कार्यालयाचे आवारात सापळा लावून थांबले.

मी व पंच देशमुखे असे श्री. कुंभार, तलाठी हे बसलेल्या तहसील कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये गेलो. त्यावेळी श्री. कुंभार, तलाठी त्याठिकाणी दिसुन आले नाहीत. त्यामुळे मी श्री. कुंभार, तलाठी यांना फोन करून पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे माझे मोबाईलचा स्पीकर फोन ऑन केला. त्यावेळी श्री. कुंभार, तलाठी यांनी मला एस. टी. स्टँड, आटपाडी येथे येण्यास सांगितले. त्यावेळी मी पंच नं. 1 देशमुखे असे कार्यालयातुन बाहेर येवुन माझी मोटार सायकल वरून एस.टी.स्टँड आटपाडी कडे रवाना झालो. त्यावेळी सापळा पथक आमचे पाठोपाठ आले. मी व पंच एस.टी. स्टँड आटपाडी येथे आलेवर त्या ठिकाणी श्री. कुंभार, तलाठी हे दिसुन न आल्याने मी पुन्हा त्यांना फोन केला असता त्यांनी मला सरकारी दवाखान्याजवळ येण्यास सांगीतले. मी व पंच नं. 1 पुन्हा माझेकडील मोटारसायकलने निघालो त्यावेळी सापळा पथक आमचे पाठोपाठ आले. सरकारी दवाखान्याचे गेटसमोर रोडकडेला श्री. कुंभार, तलाठी व त्यांचे सोबत माझे ओळखीचे बाळासो पाटील हे दोघे मोटारसायकलवर थांबलेचे दिसुन आलेने मी माझी मोटारसायकल त्यांच्याजवळ थांबविली. त्यावेळी सापळा पथक आमचे आजुबाजुस थांबुन राहिले. त्यावेळी श्री.कुंभार, तलाठी यांनी आमचे नोंदीचा फेरफार उतारा माझेकडे देवून नोंद चौदा पंधरा दिवसानी मंजुर होणार असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना उता-यासाठी कॉल करू ना" असे विचारले त्यावर श्री.कं्ुभार तलाठी यांनी "कॉल नाही करायचा, दहा पंधरा दिवसानंतर मला आठवण करायची" असे म्हणून श्री.कुंभार तलाठी यांनी माझेकडे हाताने इशारा करून पैशाची मागणी केल्याने मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातील 2,000/- रुपये अॅथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढून श्री.कुंभार तलाठी यांचेसमोर धरली असता, त्यांनी बाळासो पाटील यांना उद्देशुन "आण्णा हे घे" असे म्हणून लाच रक्कम बाळासो पाटील यांना घेण्यास सांगितले. त्यावेळी मी लाच रक्कम बाळासो पाटील यांचेसमोर धरून "मोजुन घ्या" असे म्हणालो असता बाळासो पाटील यांनी लाच रक्कम श्री. कुंभार तलाठी यांचेसमक्ष स्विकारली. त्यावेळी मी माझेकडील हातरुमाल डावे हाताने बाहेर काढून हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व पुजारी साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने श्री. कुंभार, तलाठी व बाळासो पाटील यांना ताब्यात घेतले.

सदर ठिकाणी पुजारी साहेबांनी श्री. कुंभार, तलाठी व बाळासो पाटील यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. सुधाकर कृष्णा कुंभार, वय 55 वर्ष, व्यवसाय - तलाठी पिंपरी खुर्द सजा, ता. आटपाडी जि. सांगली रा. कुंभार मळा, उंटवाडी रोड, मेंढेगीरी, ता. जत जि. सांगली व श्री. बाळासो बापुराव पाटील, वय 42, खाजगी इसम रा. पाटील मळा, पांढरेवाडी रोड, आटपाडी ता. आटपाडी जि. सांगली असे सांगीतले.



Scanned with OKEN Scanner

सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापूर्व, सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह आटपाडी येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 29.12.2023 रोजी 16.10 वा. ते 17.42 वा. च्या दरम्यान लोकसेवक श्री. सुधाकर कृष्णा कुंभार, वय 55 वर्ष, व्यवसाय - तलाठी पिंपरी खुर्द सजा, ता. आटपाडी जि. सांगली रा. कुंभार मळा, उंटवाडी रोड, मेंढेगीरी, ता. जत जि. सांगली यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने माझे वडीलांनी माझ्या आईचे नावे बोंबेवाडी, ता. आटपाडी येथील जमीन बक्षीसपत्र करून दिलेल्या बक्षीसपत्राची 7/12 सदरी नोंद करून देणेसाठी 2,000/- रूपये लाच मागणी केली. तसेच श्री.कुंभार तलाठी यांनी आमचे नोंदीचे काम सर्कल यांचेकडे गेलेनंतर त्यांना देखील 1,000/- रूपये देण्यास सांगून लाच देण्यास प्रोत्साहन दिले. तसेच सदरची लाच रक्कम श्री. सुधाकर कुंभार, तलाठी यांचे सांगणेवरून समक्ष हजर असले श्री.बाळासो बापुराव पाटील, वय 42, खाजगी इसम रा. पाटील मळा, पांढरेवाडी रोड, आटपाडी ता. आटपाडी जि. सांगली यांनी माझेकडुन प्राथमिक आरोग्य केंद्र, आटपाडीचे गेट समोरील रस्त्यावर श्री.सुधाकर कुंभार, तलाठी यांचेकरीता स्विकारून प्रोत्साहन दिले आहे. म्हणून माझी लोकसेवक श्री. सुधाकर कृष्णा कुंभार, वय 55 वर्ष, व्यवसाय - तलाठी पिंपरी खुर्द सजा, ता. आटपाडी जि. सांगली रा. कुंभार मळा, उंटवाडी रोड, मेंढेगीरी, ता. जत जि. सांगली व श्री. बाळासो बापुराव पाटील, वय 42, खाजगी इसम रा. पाटील मळा, पांढरेवाडी रोड, आटपाडी ता. आटपाडी जि. सांगली यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा दिला वर्दीजबाब,

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Sharad Shankrrao Memane (I (Inspector)) / BOBN84064 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sharad Shankrrao M

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN84064

पोलीस स्टेशन ऑफीसर
आटपाडी पोलीस स्टेशन



Scanned with OKEN Scanner